फक्त सभासदांसाठी
वर्ष ४४वे, अंक ४था ※ ऑक्टोबर २०२५

सभा : मंगळवारी संध्या. ६.३० वा.
रूईया मूक बधिर शाळेचे सभागृह,
स.प.महाविद्यालय प्रांगण (मागची बाजू)

# स्नेह सेवा

## मैत्रेय चॅरिटेबल सोसायटी, पुणे

नोंदणी क्र. MAH /1528/06/Pune, दिनांक ७ सप्टेंबर २००६
पत्रव्यवहारासाठी पत्ता :
द्वारा-प्रबोध, १०७०, शुक्रवार पेठ, सुभाषनगर लेन नं. ६, पुणे ४११००२.
snehseva1981@gmail.com

※ अध्यक्ष ※
डॉ.राधा संगमनेरकर
मो. ९८८१३०७२७८

※ संपादक ※
प्रा. रवींद्र कोठावदे
मो.९८६०४२४३४९

## जागृती निर्माण करणारे जागृतीचे व्याख्यान

**(मंगळवार, दि. ९ ऑक्टोबर, २०२५ रोजी झालेल्या जागृती आयाचित यांच्या व्याख्यानाचा सारांश)**

आपला भारत देश सनातन आहे, प्राचीन आहे, नवे ते स्वीकारणारा नित्य नवा आहे. ह्या देशावर मुस्लिम राज्यकर्त्यांनी ५०० हून अधिक वर्षं राज्य केले. इंग्रजांनी १५० वर्षं राज्य केले. जगामध्ये असे सत्ताधारी सातत्याने विस्तारवादाचा प्रयत्न करत असतात. भारताला या प्रवृत्तीचा धोका आजही आहे. भारताची सत्ता काबीज करायचा त्यांचा प्रयत्न आहे. त्यासाठी भारतातील मुस्लिम लोकसंख्या वाढविण्यास मुस्लिम धर्मनेते प्रोत्साहन देत आहेत. बांगलादेशी मुसलमान भारतात येत आहेत. त्यातील तरुण हिंदु मुलींना प्रलोभने दाखवून

त्यांना मुसलमान बनवित आहेत. अशा फसल्या गेलेल्या मुलींना शोधून त्यांना समजावण्याचा प्रयत्न **जागृती अयाचित** करीत आहेत. त्या मुलींना समुपदेशन करणे, त्यांना त्यांच्या घरी पुन्हा आणणे, ते न जमल्यास त्यांना वसतिगृहात ठेवणे व नंतर त्यांचे जीवन पुनरपी आनंदी होईल हे पहाणे, अशी अवघड कामे त्या करतात. स्वतः कॉस्ट अकाउंटंटसारखी पदवी प्राप्त केलेली असतांना त्या हे समाजकार्य पूर्ण वेळ करीत आहेत. अशा कार्यकर्त्यांची त्यांनी साखळी उभी केली आहे. त्यांचे अनुभवाचे बोल श्रोत्यांमध्ये जागृती निर्माण करणारे ठरले.

पाहुण्यांची ओळख गीता भुर्के यांनी करुन दिली. आभार प्राचार्य श्याम भुर्के यांनी मानले.

**प्राचार्य श्याम भुर्के**

## सैनिक स्नेह प्रकल्प २०२५ संपन्न

मैत्रेय चॅरिटेबल सोसायटी व स्नेहसेवा यांच्या संयुक्त विद्यमाने 'सैनिक स्नेह प्रकल्प २०२५' या उपक्रमास प्रत्यक्ष सुरुवात जून, २०२५ पासून झाली. सैनिक स्नेह प्रकल्प उपक्रमाचे यंदा २९ वे वर्ष होते.

या प्रकल्पांतर्गत विविध प्रकारच्या कामांचे वाटप प्रकल्प समितीमधील सदस्यांमध्ये करण्यात आले होते. यामध्ये सैनिकांच्या बटालियनशी संपर्क करणे, एअर इंडिया कार्गो विभागाशी पत्रव्यवहार करणे आणि चितळे बंधुंबरोबर मिठाईबाबत बोलणी करणे, या प्रमुख बाबींचा समावेश होता. त्याचबरोबर विविध प्रकारचा पत्रव्यवहार करण्यासाठी समितीतील इतर सभासद कार्यरत होते.

या प्रकल्पांतर्गत सुरुवातीला सर्वप्रथम सैनिकांना पाठवायच्या दीपावली शुभेच्छा पत्रांसाठी विविध शालाप्रमुखांना आवाहन पत्र पाठविणे, त्याचा पाठपुरावा घेणे, तसेच एअर इंडिया कार्गो विभागाशी पत्रव्यवहार करणे व चितळे बंधुबरोबर मिठाई बॉक्सला अंतिम स्वरुप देणे, या कामांना टप्प्याटप्प्याने सुरुवात होते. त्याचबरोबर देणगीदारांना आवाहन पत्र पाठविणे, काहींना टपालाने पत्र पाठविणे, हे देखील कार्य चालू असते.

त्यानंतर साधारण सप्टेंबर महिन्यामध्ये विविध शाळांकडून तयार झालेली दीपावली शुभेच्छा पत्रे गोळा करणे आणि त्याची छाननी करुन बटालियनच्या आवश्यकतेनुसार त्याचे गठ्ठे तयार करणे, हे कार्य केले जाते.

यंदाच्या वर्षी जम्मू, श्रीनगर, लेह आणि गुवाहाटी या चारही विमान तळांवर एअर इंडिया कार्गोद्वारे सीमेवरील बटालियनना पाठवायची मिठाई बॉक्सेस व त्याचे कार्टन्स एअर कार्गोद्वारे पाठवण्याचे निश्चित केले होते. या नवकल्पनेला प्रत्यक्षात अपेक्षेपेक्षा जास्त यश आले. सीमेवरील निश्चित केलेल्या सर्व बटालियन व त्यातील जवानांना वेळेपूर्वी प्रत्यक्ष मिठाईचे बॉक्सेस मिळाले.

जवानांनी फोटो आणि व्हिडिओ क्लिप पाठवून आपली कृतज्ञता व्यक्त केली.

दि. १२ ऑक्टोबर, २०२५ रोजी निवारा येथे सैनिकांना मिठाई हस्तांतरण करण्याचा औपचारिक कार्यक्रम संपन्न झाला. यासाठी एअरमार्शल प्रदीप बापट (निवृत्त) यांना प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. विविध बटालियनचे सैनिक त्यासाठी उपस्थित होते. हा कार्यक्रम हृद्यपणे संपन्न झाला.

सोमवार, दि. १३ ऑक्टोबर, २०२५ रोजी एअर इंडिया कार्गोद्वारे सर्व तेरा बटालियनना मिठाई बॉक्सेस व शुभेच्छापत्रेही पाठविण्यात आली. त्याचप्रमाणे, दि. १७ ऑक्टोबर, २०२५ रोजी खडकी येथील क्वीन मेरी टेक्निकल इन्स्टिट्यूट येथील जवानांना दीपावली मिठाई बॉक्सेस व शुभेच्छापत्रे देऊन, छोटासा करमणुकीचा कार्यक्रम देखील आयोजित करण्यात आला होता.

तसेच, दि. २२ ऑक्टोबर, २०२५ रोजी पॅराप्लेजिक रिहॅबिलिटेशन सेंटर येथे दीपावली मिठाई वितरण व मनोरंजन कार्यक्रम जवानांसाठी स्नेहसेवातर्फे आयोजित करण्यात आला होता.

अशा प्रकारे यंदाचा 'सैनिक स्नेह प्रकल्प' दि. २२ ऑक्टोबर, २०२५ रोजी यशस्वीपणे संपन्न झाला. जम्मू, श्रीनगर, लेह, तवांग आणि दिब्रुगड ह्या बटालियनच्या ठिकाणी तब्बल ७,५०० बॉक्सेस सैन्य दलास पोहोचली. यामध्ये सर्व देणगीदार, स्नेहसेवा, मैत्रेय चॅरिटेबल सोसायटीचे सभासद, सैनिक स्नेह प्रकल्पाची कोअर टीम आणि विविध शाळांमधील शालाप्रमुख, संबंधित शिक्षक व विद्यार्थी यांचा मोठ्या प्रमाणात सहभाग व यशस्वी होण्यात वाटा देखील होता.

विविध वर्तमानपत्रांनी सैनिक स्नेह प्रकल्पाला भरपूर प्रसिद्धी दिल्याने सर्वांचाच उत्साह द्विगुणित झाला, हे नमूद करण्यात अतिशय आनंद होत आहे.

अशाच प्रकारे मोठ्या प्रमाणात पुढच्या वर्षी सैनिक स्नेह प्रकल्प आयोजित करण्याचा मानस आहे.

**डॉ. दिनेश पांडे**

**(प्रकल्प प्रमुख )**

## नंदादीप तेवत ठेवला सौ. गीता व प्राचार्य श्याम भुर्के यांनी.

मंगळवार, दि. २८ ऑक्टोबर, २०२५ रोजी मराठीतील प्रथम ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त करणाऱ्या वि. स. खांडेकर यांचे जीवनदर्शन प्राचार्य श्याम भुर्के यांनी श्रोत्यांपुढे उभे केले.

सांगलीतील जन्म, फर्ग्युसन महाविद्यालयातील काळ, सावंतवाडीला जाऊन चुलत्यांना दत्तक जाणे, सावंतवाडी ते शिरोडे हे १५ मैल अंतर पायी जाऊन विद्यार्थी-प्रिय शिक्षक बनणे, चित्रपटांसाठी लेखन करण्यासाठी कोल्हापुरात येणे, साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होणे, ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त करणे, या साऱ्या गोष्टी अधोरेखित करुन प्राचार्य भुर्के यांनी रंगवून सांगितल्या.

सौ. गीता भुर्के यांनी अमृतवेल कादंबरीतील भाग, अमृत चित्रपटातील देवाचे घर, कुसुमाग्रजांच्या विशाखा या काव्यसंग्रहास खांडेकरांनी लिहिलेल्या प्रस्तावनेतील भाग कथन केला. वि.स. खांडेकरांना ययाती या कादंबरीसाठी ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त झाला. त्या कादंबरीचा सारांश प्राचार्य श्याम भुर्के यांनी लिहिला. तो सौ. गीता भुर्के यांनी एकपात्री अभिनयातून अतिशय प्रभावीपणे सादर केला; स्पष्ट शब्दोच्चार, बिनचूक पाठांतर, सुयोग्य अभिनय, यामुळे दहा मिनिटात ययाती या महान कादंबरीचे मर्म श्रोत्यांना समजले. सुख-लोलुप ययातीला Comfort आणि Bliss यामधील फरक लक्षात येत नाही. त्यातच त्याचा विवाह होतो. भौतिक प्रगती होतांना नैतिक अधोगती होता कामा नये, स्वैराचाराने समाजाचे अध:पतन होते, रोज रात्री कृतज्ञतेची नोंद ठेवा, मग झोपी जा, अशा विचारांची खांडेकरांनी केलेली मांडणी आजही प्रेरणादायी आहे.

खांडेकर महान ठरले तर आमची अभिरुची महान ठरेल. स्नेहसेवींच्या योग्य प्रतिसादामुळे त्यांची अभिरुची महान आहे, हे सिद्ध झाले.

श्री. अविनाश जोशी (उपाध्यक्ष) यांनी प्रास्ताविक केले. प्रा. रवींद्र कोठावदे यांनी कलाकारांचा परिचय करुन दिला. प्रा. सुधाताई जावडेकर यांनी कार्यक्रमाचे रसग्रहण करुन आभार प्रदर्शन केले.

प्रारंभी मनोमय अमित भुर्के यांनी बासरी वादन केले.

**प्रा. रवींद्र कोठावदे**